स्थायी समितीच्या **मंगळवार दिनांक 13–12–2016** रोजी **दुपारी 12–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| अ.क्र. | मा. सदस्य/सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| **1.** | मा. श्री. बंडू उर्फ सुधीर राऊत | सभापती |
| **2.** | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| **3.** | मा. श्री. जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| **4.** | मा. श्रीमती संगीता कळमकर | सदस्या |
| **5.** | मा. श्री. रामदास गुडधे | सदस्य |
| **6.** | मा. श्री. सुरेश जग्यासी | सदस्य |
| **7.** | मा. श्रीमती इफ्तीखर अशरफू | सदस्या |
| **8.** | मा. श्री. गणेश उर्फ मुन्ना पोकूलवार | सदस्य |
| **9.** | मा. सौ. अश्विनी जिचकार | सदस्या |
| **10.** | मा. श्री. अनिल धावडे | सदस्य |
| **11.** | मा. सौ. सरिता तिवारी | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| **2.** | मा. श्री. राजू भाऊराव नागूलवार | सदस्य |
| **3.** | मा. श्री. संजय महाकाळकर | सदस्य |
| **4.** | मा. श्रीमती कुमूदिनी कैकाडे | सदस्या |
| **5.** | मा. सौ. दिव्या धुरडे | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. जयंत दांडेगावकर, अति. उपायुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 850ः–</u> महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचे पत्र क्र. म.प.वि. / 866
**{क्रीडा व सां. विभाग}** महोत्सव/नागपूर –2016/916 कॅम्प नागपूर दि. 7/12/2016 यांचे पत्राचे अवलोकन करावे.

नागपूर महानगरपालिका व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचे संयुक्त विद्यमाने दि. 16 ते 19 डिसेंबर, 2016 दरम्यान यशवंत स्टेडीयम नागपूर येथे ''नागपूर महोत्सव''चे आयोजन करण्यात येणार आहे.

या महोत्सवाकरिता एकूण रु. 3.50 कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्याबाबत पर्यटन विभागाने राज्य शासनाला विनंती केलेली आहे. त्यांचे पत्रात नमुद करण्यात आल्याप्रमाणे निधीचे वर्गीकरण खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| अ)दि. 16 ते 19 डिसेंबर, 2016 दरम्यान यशवंत सभागृह, नागपूर येथे आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचा अपेक्षित खर्च (मुख्य कलाकार वगळून) | रु. 1,70,54,046/— |
| ब) दि. 5 ते 15 डिसेंबर, 2016 दरम्यान नागपूर मधील 10 विविध विभागात आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचा अपेक्षित खर्च (प्रत्येकी 1 विभाग) | रु. 17,17,893/— X 10<br>एकूण रु. 1,71,78,930/— |
| असे एकूण — | रु. 3,42,32,977/— |

मुख्य कलाकाराचे मानधन, परिवहन, भोजन, निवास व लोकल ट्रॅव्हल देय भुगतानाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| 1) दि. 16 डिसेंबर, 2016 | रु. 30,00,000/— |
| Artist - Musical Act Ashok Hande - 200 artist Mumbai<br>Stay, Food & Travel Arrangement | रु. 10,00,000/— |
| 2) दि. 17 डिसेंबर, 2016 | रु. 30,00,000/— |
| Artist - Chala Hawa Yewu Dya<br>Stay, Food & Travel Arrangement | रु. 5,00,000/— |
| 3) दि. 18 डिसेंबर, 2016 | रु. 45,00,000/— |
| Artist - Shankar Mahadevan<br>Stay, Food & Travel Arrangement | रु. 20,00,000/— |
| 3) दि. 19 डिसेंबर, 2016 | रु. 45,00,000/— |
| Artist - Frahan Akhtar<br>Stay, Food & Travel Arrangement | रु. 10,00,000/— |
| एकूण — | रु. 1,95,00,000/— |

एकंदरीत नागपूर महोत्सवाला महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचेद्वारे रु. 3,42,32,977/— राज्य शासनाकडून अनुदानाद्वारे अपेक्षीत आहे. तसेच म.न.पा. द्वारे कलाकारांचे मानधन, परिवहन, भोजन, निवास याकरिता यशवंत स्टेडीयम येथील मुख्य कार्यक्रमाचा अंदाजीत खर्च रु.1,95,00,000/— अपेक्षीत आहे. तसेच म.न.पा. च्या 10 विविध क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत होणाऱ्या नागपूर महोत्सवाच्या कार्यक्रमास रु. 57,38,500/— खर्च होणार आहे.

सन 2015 च्या नागपूर महोत्सवाच्या आयोजन दरम्यान देणगीद्वारे प्राप्त रु. 64.96 लक्ष जमा आहे. तसेच या वर्षी मेट्रो रेल्वे कडून रु. 25 लक्ष तथा नागपूर सुधार प्रन्यास तर्फे रु. 10 लक्ष प्राप्त होणार आहे असे एकूण रु. 99.96 लक्ष गृहीत धरण्यात येत आहे. या व्यतिरीक्त लागणार निधी इतर देणगीद्वारे विविध जाहिराती अन्यवे संकलीत करण्याचा आयोजन समितीचा मानस आहे.

दि. 16 डिसेंबर, 2016 पासून हा महोत्सव सुरु होणार असून मिळालेला कालावधी अतिशय कमी आहे त्यामुळे कलाकार निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था परिवहनाची सोय, जाणे येणे तिकीट खर्च मागील वर्षाचा ''नागपूर महोत्सव'' ज्या एजन्सीने हे काम केले होते त्याच एजंसीला कालावधी कमी असल्यामुळे वाटाघाटी करुन नियुक्त करने योग्य होईल. एजंसीचे नावे खालील प्रमाणे. —

1) कलाकार तिकीट व्यवस्था — मे. ट्रर्व्हल्स लिंक, नागपूर
2) निवास व भोजन — मे. वी. द. वर्कींग एलीमेंट
3) कलाकार लोकल ट्रव्हर्स — मे. महेश ट्रव्हर्ल्स

उपरोक्त तिनही एजेन्सीला मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

1) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित यांचे म.प.वि.म./866/नागपूर—संत्रा/2016/916 दि. 7/12/2016 च्या पत्राच्या अनुषंगाने नागपूर महोत्सव 2016—17 हा कार्यक्रम घेण्याच्या दृष्टीने ज्या संयोजक अभिकर्ता संस्थांना महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने नियुक्त केले आहे या

संस्थेला कार्यक्रम संयोजक अभिकर्तााला मे. वी. द. वर्कींग एलीमेंट यांना कार्यादेश देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

2) दि. 16 ते 19 फेब्रुवारी, 2016 या चार दिवसात ज्या प्राधिकृत केलेल्या मे. वी. द. वर्कींग एलीमेंट या एजेन्सी मार्फत कलावंताना वित्तीय भुगतान करण्याचे अधिकारी म.न.पा. आयुक्त यांना देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन अग्रीम वित्तीय भुगतान करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

3) महानगरपालिकेच्या वित्तीय सहभागातून आवश्यक व तात्काळ स्वरुपाची कार्यक्रम व्यवस्थीतरित्या आयोजित करण्याच्या दृष्टीने विभागास कुठलेही कामे करावयाची झाल्यास त्यास लघुनिविदाद्वारे किंवा आवेदनाद्वारे करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारणीस देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

4) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचेद्वारे अनुदान स्वरुपात जो निधी म.न.पा. स प्राप्त होणार आहे तसेच नागपूर महोत्सवा निमित्त जाहिरातीद्वारे देणगी स्वरुपात निधी गोळा होणार आहे. त्यांस राज्य शासनाकडून अनुदान प्राप्त होई पर्यंत म.न.पा. निधीतून अर्थसंकल्पीय पद क्र. A26502242214 (नागपूर महोत्सव) मधून रु. 300 लक्ष निधी नागपूर महोत्सवाचे खात्यामध्ये वळते करणे तसेच अनुदान प्राप्त झाल्यावर समायोजन करण्याचा प्रश्न तसेच उपरोक्त प्रस्तावास वित्तीय व प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेऊन.

उपरोक्त प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्याचा तथा वरील प्रस्तावित खर्चाचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 851</u>:— **{स्थावर विभाग}** मौजा—नागपूर, खसरा क्र. २७६, २७८ व २७९, शिट क्र. २१२, नगर भुमापन क्रमांक २५७, बाभुळवन येथिल महानगरपालिकेची बंद शाळा इमारत (G+१) व ७०००.०० चौ.मी. जागा स्किल ट्रेनिंग सेंटर करीता लार्सन अँड टुब्रो लि. यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७९ (g) मधील तरतुदीनुसार रु. १/— प्रती चौ.फुट नुसार चे अधीमुल्य राशीने व या विनियोगास राज्य शासनाची मान्यता प्राप्त करण्याचे अटींचे अधीन राहुन ३० वर्षाचे भाडेपट्ट्याने देण्यास मान्यता प्रदान करण्याचा तसेच राज्य शासनास प्रस्ताव सादर करण्याकरीता चे अधिकार आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन म.न.पा. सभागृहास पाठविण्याची एकमताने शिफारीस करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 852</u>:— **{लोककर्म झोन 08}** प्रभाग क्र. 36 ब मधील वर्धमाननगर आणि पूर्व वर्धमाननगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याकरिता प्रापत निविदाकार मे. एस. के. गुरुबक्षाणी यांचे प्राकलनीय दरावर रु. 49,99,945/— राशीची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

या कामाचा खर्च पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रस्तावित आहे.

<u>ठराव क्रमांक 853</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव<br>महानगरपालिका,नागपूर

सभापती<br>स्थायी समिती,<br>महानगरपालिका,नागपूर